(1)


# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

सिडको भवन,(दक्षिण कक्ष), बेलापूर, नवी मुंबई-४०० ६१४
दूरध्वनी : २७५७१६७३, २७५७०१६६ व २७५७८४०९
ई-मेल : ms@mjp.gov.in/ cao@mjp.gov.in


जा.क्र.मजीप्रा-२०२३/प्र.क्र.१/बैठक-१५४/आ-४, दिनांक :- ४/०५/२०२३

**प्रति,**

मा.मंत्री, नगर विकास तथा प्राधिकरणाचे सह अध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.
मा.मंत्री, ग्राम विकास तथा प्राधिकरणाचे सह अध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.
अपर मुख्य सचिव, ग्राम विकास विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
अपर मुख्य सचिव (व्यय) वित्त विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव (उर्जा) उद्योग, उर्जा कामगार विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव (न.वि.२) नगर विकास विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई.

**विषय :** दिनांक २५ एप्रिल, २०२३ रोजी झालेल्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या संचालक मंडळाच्या १५४व्या बैठकीचे इतिवृत्त.

महोदय,

दिनांक २५ एप्रिल, २०२३ रोजी झालेल्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या संचालक मंडळाच्या १५४व्या बैठकीचे इतिवृत्त आपल्या माहितीसाठी सोबत सादर करण्यात येत आहे.

मान्यतेने,

आपली विश्वासू,

४/५/२३

सोबत :- इतिवृत्ताची प्रत

**(दिपाली देशपांडे-सावेडकर)**
**मुख्य प्रशासकीय अधिकारी**

**प्रत :** मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा अध्यक्ष, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई, यांचे माहितीसाठी.

सोबतचे इतिवृत्त मा.मंत्री, पा.पु. स्व. यांचे अवलोकनार्थ सादर करावे, ही विनंती.

**प्रत: माहितीसाठी व कार्यवाहीसाठी.**

- संचालक (वित्त), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सिडको भवन, नवी मुंबई.
- उप सचिव (पापु-२३), पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.
- मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, प्रादेशिक विभाग, ठाणे/पुणे/नाशिक/औरंगाबाद/ अमरावती/नागपूर.

..२/-

...२...

- अधीक्षक अभियंता (मुख्यालय), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई.
- अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, म.नि.सं. व सं.कक्ष, मित्तल चेंबर्स, मुंबई.
- उप अभियंता (आय.टी.सेल), मित्तल चेंबर्स, मुंबई.

सोबतचे इतिवृत्तातील आपल्या कार्यालयाशी संबंधीत कार्यक्रम बाबींवर योग्य ती कार्यवाही त्वरित करुन केलेल्या कार्यवाहीचा कार्यपुर्ती अहवाल १० दिवसांत मध्यवर्ती कार्यालयास सादर करावा.

# महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या १५४व्या बैठकीचे इतिवृत्त.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची १५४वी बैठक मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे पदसिध्द अध्यक्ष, मा.श्री.गुलाबराव पाटील यांचे अध्यक्षतेखाली मा.मंत्री महोदय यांचे दालन क्र.४०२, चौथा मजला, मुख्य इमारत, मंत्रालय, मुंबई येथे मंगळवार दिनांक २५ एप्रिल, २०२३ दुपारी १२.०० वाजता संपन्न झाली. या बैठकीस महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या संचालक मंडळाचे खालील सदस्य उपस्थित होते.

१) मा.श्री.गुलाबराव पाटील, मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे अध्यक्ष.
२) श्री.राजेश कुमार, अपर मुख्य सचिव, ग्राम विकास विभाग, मंत्रालय मुंबई तथा प्राधिकरणाचे सदस्य
३) श्री.संजीव जयस्वाल, प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय मुंबई तथा प्राधिकरणाचे सदस्य
४) श्री.अभिषेक कृष्णा, सदस्य सचिव म.जी.प्रा.मुंबई तथा प्राधिकरणाचे सदस्य सचिव

या व्यतिरिक्त सदर बैठकीस खालील अधिकारी उपस्थित होते.

१) श्री.राजेंद्र मडके, संचालक (वित्त), म.जी.प्रा., सिडको भवन, नवी मुंबई.
२) श्रीमती दिपाली देशपांडे-सावेडकर, मुख्य प्रशासकीय अधिकारी, म.जी.प्रा. मुंबई.
३) श्री.अजय सिंह, अधीक्षक अभियंता (मु.), म.जी.प्रा.मुंबई.

सर्व प्रथम सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत केले. त्यानंतर मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे अध्यक्ष, यांच्या परवानगीने बैठकीस सुरुवात करण्यात आली.

**कार्यक्रम बाब क्र.:- १ :-** महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या च्या १५३व्या बैठकीच्या इतिवृत्तास मान्यता देणे.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या संचालक मंडळाची १५३वी बैठक दिनांक १८ ऑक्टोबर, २०२२ रोजी संपन्न झाली. सदर बैठकीच्या इतिवृत्तास मान्यता प्रदान करण्याचा प्रस्ताव संचालक मंडळास सादर करण्यात आला व त्यास मान्यता प्रदान करण्याची विनंती सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी संचालक मंडळास केली.

इतिवृत्तावर चर्चा होऊन, १५३व्या बैठकीच्या इतिवृत्तास संचालक मंडळाने मान्यता दिली.

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

**कार्यक्रम बाब क्र. २:-** महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या १५३व्या बैठकीपुढील बाबींवर करण्यात आलेल्या कृतीस मान्यता देणे.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या संचालक मंडळाची दिनांक १८ ऑक्टोबर, २०२२ रोजी संपन्न झालेल्या १५३व्या बैठकीमध्ये जे निर्णय घेण्यात आले, त्या निर्णयाच्या अनुषंगाने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने केलेल्या कार्यवाहीबाबत सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी संचालक मंडळास अवगत केले. त्यानुसार १५३व्या बैठकीपुढील बाबींवर करण्यात आलेल्या कार्यवाहीस मान्यता देण्यात आली.

**कार्यक्रम बाब क्र.३ :-** महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या निविदा समितीने घेतलेल्या निविदा स्वीकृतीच्या/ अस्वीकृतीच्या निर्णयावर शिक्कामोर्तब करणेबाबत.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या निविदा समितीच्या १४६ ते १६२ व्या बैठकीमध्ये निविदा स्वीकृती/अस्वीकृतीच्या घेतलेल्या निर्णयांवर मा.संचालक मंडळाने शिक्कामोर्तब करण्याविषयीच्या कार्यक्रम बाबीवर मा.संचालक मंडळाच्या बैठकीत सविस्तर चर्चा झाली व पुढीलप्रमाणे ठराव पारीत करण्यात आला.

**ठराव :**

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या निविदा समितीच्या १४६ ते १६२ व्या बैठकीमध्ये निविदा स्वीकृती/अस्वीकृतीच्या घेतलेल्या निर्णयांना मा.संचालक मंडळाने मान्यता दिली. याबाबत पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

**कार्यक्रम बाब क्र.४ :-** संरक्षण पाणी पुरवठा केंद्रे, साकोरे (मिग) ता.निफाड, जि.नाशिक संरक्षण पाणी पुरवठा केंद्रामधील दुरुस्तीची कामे घसारा निधीतून करावयाचे सुधारीत कामांचे प्रस्ताव.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या संचालक मंडळाच्या दि.२७.१.२०२२ रोजीच्या १४७ व्या बैठकीत म.जी.प्रा.च्या मालकीच्या साकोरे संरक्षण पाणी पुरवठा केंद्रात ता.निफाड जि.नाशिक विविध उपागांमधील रु.१००.२० लक्ष किंमतीच्या दुरुस्तीची कामे म.जी.प्रा.च्या घसारा निधीतून करण्यास मान्यता प्रदान करण्यात आली. सदर कामामध्ये कार्यक्रम बाबीत उल्लेख केलेल्या विविध कारणांमुळे मूळ मंजूर किंमतीवर रु.२७.९४ लक्ष वाढ होऊन योजनेची सुधारीत किंमत रु.१२६.४१ लक्ष इतकी झाली आहे. या कार्यक्रम बाबीवर मा.संचालक मंडळाच्या बैठकीत सविस्तर चर्चा झाली व पुढीलप्रमाणे ठराव पारीत करण्यात आला.

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

**ठराव :**

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मालकीच्या साकोरे संरक्षण पाणी पुरवठा केंद्रात ता.निफाड जि.नाशिक विविध उपागांमधील यापूर्वी मान्यता देण्यात आलेल्या रु.१००.२० लक्ष किंमतीच्या अंदाजपत्रकामध्ये रु.२७.५० लक्ष इतकी वाढ झाली असून, वाढीव किंमतीची आवश्यक त्या दुरुस्तींची कामे म.जी.प्रा.च्या घसारा निधीतून करण्यास पुढील अटी व शर्तींच्या अधीन राहून मा.संचालक मंडळाने मान्यता दिली.

**अटी व शर्ती :**

१. निधीच्या उपलब्धतेनुसार कामे हाती घेण्यात यावीत.

२. दुरुस्तीच्या कामांची अंमलबजावणी ई-निविदा प्रक्रियेनुसार करण्यात यावी.

३. मा. संचालक मंडळाने मंजूर केलेल्या निधीपेक्षा जास्त खर्च करण्यात येऊ नये.

याबाबत पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

**कार्यक्रम बाब क्र.५ :-** नगरोत्थान महाभियानांतर्गत शाहूनगर (सातारा शहरी) नळ पाणी पुरवठा योजना ता.जि.सातारा (कृष्णा नदी उद्भव)-
स्थानिक स्वराज्य संस्थेच्या हिश्याची रक्कम म.जी.प्रा.च्या घसारा निधीतून उपलब्ध करणेबाबत.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या लष्कर पाणी पुरवठा केंद्रामधून सातारा नगर परिषद हद्दीमध्ये तसेच सभोवतालच्या भागामध्ये पाणी पुरवठा करणेत येतो. शाहूनगरसाठी अस्तित्वातील पाणी पुरवठा योजना म.जी.प्रा.मार्फत सन १९७७ आणि १९८९ मध्ये अंमलात आणली होती.

अस्तित्वातील जॅकवेलची दुरूस्ती, नवीन उद्भवाची कामे (जॅकवेल, कनेक्टिंग पाईप, इंटेक वेल) अशुद्ध पाणी ऊर्ध्ववाहिनी, पंपिंग मशिनरी, शुद्ध पाणी ऊर्ध्ववाहिनी, उंच / बैठी साठवण टाकी, वितरण व्यवस्था इ. कामांचा समावेश नगरोत्थान महाभियानांतर्गत शाहूनगर (सातारा शहरी) नळ पाणी पुरवठा योजनेत ता.जि.सातारा (कृष्णा नदी उद्भव) करण्यात आला आहे. सदर योजनेस मुख्य अभियंता म.जी.प्रा. पुणे यांनी त्यांच्या दि.२१.११.२०२२ च्या पत्रान्वये रु.३४३५.६९ लक्ष ढोबळ किंमतीस तांत्रिक मान्यता प्रदान केली आहे.

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

प्रधान सचिव, नगरविकास विभाग (नवि-२) यांच्या अध्यक्षेतेखाली दि.३१.१०.२०२२ रोजी घेण्यात आलेल्या बैठकीत सदर नगरोत्थान महाभियानांतर्गत प्रस्तावित योजनेच्या आकृतीबंधाच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे सूचना देण्यात आल्या आहेत.

"सदर प्रकल्पासाठी सदर प्रकल्पाच्या वित्तीय आकृतीबंधानुसार नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेने उभारावयाचा निधी मुख्य अभियंता, म.जी.प्रा., पुणे, कार्यकारी अभियंता, म.जी.प्रा., सातारा यांनी मान्य केल्यानुसार म.जी.प्रा.मार्फत उभारण्यात येईल असा प्राधिकरणाच्या बोर्डाने ठराव मंजूर करावा."

प्रस्तावित योजनेची ढोबळ किंमत रु.३४.३६ कोटी इतकी असून योजनेचा वित्तीय आकृतीबंध खालीलप्रमाणे आहे.

| वित्तीय आकृतीबंध | राज्य शासन अनुदान | स्थानिक स्वराज्य संस्था हिस्सा (मजीप्रा हिस्सा) | एकुण |
|---|---|---|---|
| | ७५% रु.२५.७७ कोटी | २५% रु.८.५९ कोटी | रु.३४.३६ कोटी |

उपरोक्तनुसार स्थानिक स्वराज्य संस्थेचा हिस्सा रु.८.५९ कोटी म.जी.प्रा.च्या घसारा निधीतून उभारावयाचा आहे. सदर प्रस्तावाबाबत मा.संचालक मंडळाच्या बैठकीत सविस्तर चर्चा झाली व पुढीलप्रमाणे ठराव पारीत करण्यात आला.

**ठराव :**

म.जी.प्रा.च्या मालकीच्या शाहूनगर पाणी पुरवठा केंद्रातील शाहूनगर शहराची भविष्यातील पाणी मागणी लक्षात घेता शहराच्या सन २०५४ च्या प्रकल्पित लोकसंख्येकरीता कृष्णा नदी उद्भव धरून तयार करण्यात आलेली रु.२९.१२ कोटी (निव्वळ) व रु.३४.३६ कोटी (ढोबळ) किंमतीची योजना म.जी.प्रा.मार्फत राबविण्यास, मा.संचालक मंडळाने पुढील अटी व शर्तींच्या अधिन राहून मान्यता दिली.

**अटी व शर्ती :**

सदर योजनेस शासनाच्या नगर विकास विभागाची मान्यता घेण्यात यावी. योजनेच्या किंमतीच्या ७५% हिस्सा (रु.२५.७७ कोटी) राज्य शासनाकडून उपलब्ध करावयाचा असून उर्वरित २५% हिस्सा (रु.८.५९ कोटी) स्थानिक स्वराज्य संस्थेने उपलब्ध करावयाचा आहे. सदर

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

योजना म.जी.प्रा.ची योजना असल्याने स्थानिक स्वराज्य संस्थेच्या हिश्श्याची रक्कम रु.८.५९ कोटी मजी.प्रा.च्या घसारा निधीतून परत करण्याच्या अटीच्या अधीन राहून (सदर योजनेच्या उत्पनातून तेवढी रक्कम पुन:श्च घसारा निधीमध्ये जमा करण्याच्या अटीच्या अधिन राहून) उपलब्ध करण्यास मान्यता देण्यात येत आहे. सदर रक्कम घसारा निधी मध्ये पुन:श्च जमा करण्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित कार्यकारी अभियंता यांची राहील.

याबाबत पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव, म.जी.प्रा. यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

**कार्यक्रम बाब क्र.६ :-** महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचा सन २०१७-१८ वा वार्षिक लेखा परिक्षण अहवाल

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या संचालक मंडळाची १५४ वी बैठक दिनांक २५ एप्रिल २०२३ रोजी संपन्न झाली. सदर बैठकीत महालेखाकार कार्यालय (लेखा परीक्षा-II) महाराष्ट्र, नागपूर, त्यांचेकडील गोपनीय पत्र क्र. डी.पी.सेल/ए,एम.जी II/पृ.ले.प.प्रतिवेदन/२०१७-१८/३९२ दि.२१-१२-२०२२ अन्वये महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या सन २०१७-१८ वार्षिक लेख्यावरील लेखा परीक्षण अहवाल अनुपालनालह प्राधिकरणाच्या मान्यतेकरीता या कार्यक्रम बाबीद्वारे सादर केला आहे.

प्राधिकरणाच्या मान्यतेनंतर महालेखापालानी प्रमाणित केलेले सन २०१७-१८ चे लेखे व लेखा परीक्षण अहवाल वार्षिक अहवालासोबत विधी मंडळाच्या दोन्ही सभागृहापुढे ठेवण्यासाठी मान्यता मिळणेसाठी कार्यक्रम बाब क्र.६ अन्वये महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या सन २०१७-१८ वार्षिक लेख्यावरील लेखा परीक्षण अहवाल अनुपालनालह संचालक मंडळाने मान्यता प्रदान केली असून खालील प्रमाणे ठराव पारीत करण्यात आला आहे.

**ठराव :**

असा ठराव मंजूर करण्यात येतो की, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या सन २०१७-१८ वार्षिक लेख्यावरील लेखा परीक्षण अहवालास अनुपालनासह मान्यता देण्यात येत आहे. तसेच सन २०१७-१८ चे वार्षिक लेखे या लेखा परीक्षण अहवालासह महाराष्ट्र राज्याच्या विधी मंडळाच्या दोन्ही सभागृहापुढे सादर करण्याकरीता शासनाकडे पाठविण्यासाठी मंजूरी देण्यात येत आहे.

याबाबत पुढील कार्यवाही करण्यास प्राधिकरणाचे सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

**कार्यक्रम बाब क्र.७ :-** महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचा सन २०१८-१९ वा वार्षिक लेखा परिक्षण अहवाल

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या संचालक मंडळाची १५४ वी बैठक दिनांक २५ एप्रिल २०२३ रोजी संपन्न झाली. सदर बैठकीत महालेखाकार कार्यालय (लेखा परीक्षा-II) महाराष्ट्र, नागपूर, त्यांचेकडील गोपनीय पत्र क्र. डी.पी.सेल/ए,एम.जी II/MJP/पृ.ले.प.प्रतिवेदन/२०१८-१९/३७७ दि.११-१०-२०२२ अन्वये महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या सन २०१८-१९ वार्षिक लेख्यावरील लेखा परीक्षण अहवाल अनुपालनालह प्राधिकरणाच्या मान्यतेकरीता या कार्यक्रम बाबीद्वारे सादर केला आहे.

प्राधिकरणाच्या मान्यतेनंतर महालेखापालानी प्रमाणित केलेले सन २०१८-१९ चे लेखे व लेखा परीक्षण अहवाल वार्षिक अहवालासोबत विधी मंडळाच्या दोन्ही सभागृहापुढे ठेवण्यासाठी मान्यता मिळणेसाठी कार्यक्रम बाब क्र.७ अन्वये महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या सन २०१८-१९ वार्षिक लेख्यावरील लेखा परीक्षण अहवाल अनुपालनालह संचालक मंडळाने मान्यता प्रदान केली असून खालील प्रमाणे ठराव पारीत करण्यात आला आहे.

**ठराव :**

असा ठराव मंजूर करण्यात येतो की, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या सन २०१८-१९ वार्षिक लेख्यावरील लेखा परीक्षण अहवालास अनुपालनासह मान्यता देण्यात येत आहे. तसेच सन २०१८-१९ चे वार्षिक लेखे या लेखा परीक्षण अहवालासह महाराष्ट्र राज्याच्या विधी मंडळाच्या दोन्ही सभागृहापुढे सादर करण्याकरीता शासनाकडे पाठविण्यासाठी मंजूरी देण्यात येत आहे.

याबाबत पुढील कार्यवाही करण्यास प्राधिकरणाचे सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

**कार्यक्रम बाब क्र.८ :-** महाराष्ट्र जीवन प्राधिकरण सुधारीत अंदाज सन २०२२-२३ व अर्थसंकल्पिय अंदाज सन २०२३-२४

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या संचालक मंडळाची १५४ वी बैठक दिनांक २५ एप्रलि, २०२३ रोजी संपन्न झाली. सदर बैठकीत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे सन २०२२-२३ चे सुधारीत अंदाजपत्रक व सन २०२३-२४ चे अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकाबाबत सविस्तर माहिती संचालक मंडळास देण्यात आली. चर्चेअंती सदर बैठकीत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे सन

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

२०२२-२३ चे सुधारीत अंदाजपत्रक व सन २०२३-२४ चे अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकाबाबत कार्यक्रम बाब क्र.८ अन्वये संचालक मंडळाने मान्यता प्रदान केली आहे. तसेच खालीलप्रमाणे ठराव पारीत करण्यात आला आहे.

**ठराव** :

असा ठराव पारित करण्यात येतो की, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे सन-२०२२-२३ चे सुधारित अंदाज व सन-२०२३-२४ चे महसुली व भांडवली अर्थसंकल्पीय अंदाज खालील प्रमाणे मान्य करण्यात येत आहे.

(रुपये लक्ष)

| अ.क्र. | तपशिल | सन-२०२२-२३ चे सुधारित अंदाज | सन-२०२३-२४ चे अर्थसंकल्पीय अंदाज |
|---|---|---|---|
| १ | महसुली जमा | १३८०३३.२७ | १६६१०९.८० |
| २ | महसुली खर्च | १२९७९८.२७ | १३८२५०.२९ |
| ३ | भांडवली जमा | ४०३३१.५९ | २६७९८.१८ |
| ४ | भांडवली खर्च | ४०३३१.५९ | २६७९८.१८ |

असा ठराव करण्यात येतो की,

१) सादर केलेल्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे सन २०२२-२३ चे सुधारीत व सन २०२३-२४ चे अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकास मान्यता देण्यात येत आहे.

२) महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने शासनाकडे नियमित आस्थापनेवरील कर्मचा-यांसाठी ७ वा वेतन लागु केल्यामुळे वेतन व भत्ते थकबाकीसाठी सन २०२२-२३ मध्ये थकबाकीची रक्कम न मिळाल्याने सन २०२३-२४ साठी म.जी.प्रा.स हप्त्याची रक्कम प्रत्येकी रु.२१.२१ प्रमाणे चार हप्त्याची रक्कम रु.८४.८४ कोटी व अर्जित रजा रोखीकरण थकबाकीसाठी एकरकमी रु ८.२९ कोटी निधी म.जी.प्रा.स उपलब्ध करुन देण्यात यावा.

३) महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने सन २०२३-२४ साठी लेखाशिर्ष क्र.२२१५A०४१ अंतर्गत अधिकारी/कर्मचारी यांना वेतन व भत्यासाठी नियमित आस्थापनेवरील कर्मचा-यांसाठी रु. ३५३.३२ कोटी अनुदान मागितलेले आहे. प्रत्यक्ष वेतन व भत्त्यासाठी लागणा-या खर्चासाठी

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

रु.२२७.८१ कोटीची तरतूद शासनाने अर्थसंकल्पात केलेली आहे. तरी मागणी केलेले संपूर्ण अनुदान म.जी.प्रा.स उपलब्ध करुन देण्यात यावे.

४) महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने शासनाकडे म.जी.प्रा.च्या सेवा निवृत्त कर्मचाऱ्यांच्या निवृत्ती वेतन,उपदान व अंशदान (थकबाकी वगळून) सन २०२२-२३ मध्ये रु. ३७९.८७ कोटी खर्च झालेला आहे. शासनाच्या व्हाईट बुक मध्ये सेवा निवृत्त कर्मचाऱ्यांसाठी सन २०२२-२३ मध्ये नियमित निवृत्तीवेतनासाठी रु.३७९.२० कोटी व त्यांच्या ७ वा वेतन आयोग थकबाकीसाठी रु.२५५.४० कोटी असे मिळून एकत्रित रु.६३४.६० कोटीची अंदाजपत्रकीय तरतुद केली आहे. म.जी.प्रा.ने खर्च केलेले सन २०१७-१८ ते २०२०-२१ मधील रु १७२.११ कोटी व सन २०२१-२२ मधील रु ४४.६५ कोटी तसेच सन २०२२-२३ मधील रु.०.६७ कोटी असे एकूण रु.२१७.४३ कोटी अनुदान उपलब्ध करुन देण्यात यावे.

५) महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने शासनाकडे म.जी.प्रा.च्या सेवा निवृत्त कर्मचाऱ्यांसाठी सन २०२३-२४ मध्ये अर्थसंकल्पीय अंदाज रु.७३२.८५ कोटी (निवृत्ती वेतन व इतर लाभ रु.४६२.६५ कोटी व ७ वा वेतन आयोग २ हप्ते रक्कम रु.५३.४४ कोटी, मागील थकबाकी रु १७२.११ कोटी व रु ४४.६५ कोटी ) अंदाजपत्रकीय तरतुद मागितलेली आहे. शासनास सदर अनुदान उपलब्ध करुन देण्याची विनंती करण्यात येईल.

६) म.जी.प्रा.च्या मालकीच्या ईमारतीचे इमारत बांधकाम व देखभाल व दुरूस्तीसाठी रु.१५ कोटी व अंबरनाथ व बदलापूर येथील पाणी पुरवठा योजनेसाठी घसारा निधीतून अनुक्रमे रु.५२३.९५ लक्ष व रु.२२८५.०७ लक्ष तरतूद करण्यात यावी.

याबाबत पुढील कार्यवाही करण्यास महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

**कार्यक्रम बाब क्र.९ :-** नगरोत्थान महाअभियानांतर्गत/अमृत अभियानांतर्गत योजनांपैकी म.जी.प्रा.मार्फत चालविण्यात येत असलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या हिश्याची रक्कम म.जी.प्रा.च्या स्वनिधीतून/घसारा निधीतून उपलब्ध करुन देण्यास मान्यता मिळणेबाबत.

म.जी.प्रा.च्या मालकीच्या शहरी पाणी पुरवठा केंद्रांच्या बाबतीत योजनेची कार्यवाही त्वरीत होण्याच्या दृष्टीने नगरोत्थान महाअभियानांतर्गत/अमृत अभियानांतर्गत इ. कार्यक्रमांतर्गत

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

प्रशासकीय मंजूरीच्या शासन निर्णयामध्ये उल्लेखित वित्तीय आकृतीबंधामधील स्थानिक स्वराज्य संस्थेच्या हिश्श्याचा भाग म.जी.प्रा.च्या स्वनिधीतून / घसारा निधीतून उपलब्ध करुन देण्याबाबतच्या कार्यक्रम बाबीवर मा.संचालक मंडळाच्या बैठकीत सविस्तर चर्चा झाली व पुढीलप्रमाणे ठराव पारीत करण्यात आला.

**ठराव :**

म.जी.प्रा.च्या मालकीच्या शहरी पाणी पुरवठा केंद्रांच्या बाबतीत नगरोत्थान महाअभियानांतर्गत / अमृत अभियानांतर्गत इ. कार्यक्रमांतर्गत प्रशासकीय मंजूरीच्या शासन निर्णयामध्ये उल्लेखित वित्तीय आकृतीबंधामधील स्थानिक स्वराज्य संस्थेच्या हिश्श्याचा भाग म.जी.प्रा.च्या स्वनिधीतून/घसारा निधीतून, परत करण्याच्या अटीच्या अधीन राहून (संबंधीत योजनेच्या उत्पनातून तेवढी रक्कम पुन:श्च घसारा निधीमध्ये जमा करण्याच्या अटीच्या अधिन राहून) उपलब्ध करण्यास मा.संचालक मंडळाने मान्यता दिली. याबाबतीत पुढील कार्यवाही करण्यास मा.सदस्य सचिव तसेच संचालक (वित्त) यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

**कार्यक्रम बाब क्र.१० :-** महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे ग्राहकांकडील पाणीपट्टीवरील विलंब शुल्क माफ करण्याच्या अभय योजनेच्या कालावधीस मुदत वाढवून मिळणेबाबत

अभय योजनेच्या तरतुदीमध्ये ग्राहकांकडील पाणीपट्टीवरील विलंब शुल्क माफ करण्याच्या अभय योजनेच्या कालावधीस मुदत वाढवुन मिळणेबाबत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या संचालक मंडळाच्या बैठकीत सविस्तर चर्चा होऊन संचालक मंडळाची मान्यता मिळाली असून खालील प्रमाणे ठराव पारित करण्यात आला आहे.

**ठराव :-**

१) महाराष्ट्र जीवन प्राधिकरण ग्राहकांकरीता पाणीपट्टीच्या मुळ मुद्दलावरील विलंब आकार माफीच्या सवलतीची योजना म.जी.प्रा.चे परिपत्रक क्र. मजीप्रा/वित्त-१/वसुली/अभय योजना/२०२२/५ दि.२१.०१.२०२२ पासून लागू केली असून सदर योजनेत आवश्यकतेप्रमाणे केलेल्या बदलास शासनाने मान्यता दिली आहे. त्याचप्रमाणे सदर अभय योजनेच्या कालावधीस पुढील सहा महिने एप्रिल २०२३ ते सप्टेंबर २०२३ पर्यत राबविण्यास मान्यता देण्यात येत आहे.

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून जाहीर करण्यात आलेल्या अभय योजनेत आवश्यकतेप्रमाणे केलेल्या बदलास वरील प्रमाणे शासनाने मान्यता दिल्याप्रमाणे योजना राबविण्यास पुढील सहा महिने मुदतवाढ देण्यात येत आहे. त्याप्रमाणे शासनास प्रस्ताव मंजुरीसाठी सादर करण्याकरिता मा.सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

**कार्यक्रम बाब क्र.११ :-** जल जीवन मिशन कार्यक्रमांतर्गत पाणी पुरवठा योजनांच्या बाबतीत राष्ट्रीय महामार्ग क्रासिंगच्या बाबतीत भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाकडे जमा करावयाच्या परफॉर्मन्स बँक गॅरंटीसाठी लागणारी रक्कम म.जी.प्रा.च्या स्वनिधीतून उपलब्ध करुन देण्यास मान्यता मिळणेबाबत.

जल जीवन मिशन कार्यक्रमांतर्गत विविध पाणी पुरवठा योजनांसाठी राष्ट्रीय महामार्ग क्रॉसिंगकरीता भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाची परवानगी घ्यावी लागते. सदर परवानगी देताना भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाकडून परफॉर्मन्स बँक गॅरंटीची मागणी करण्यात येते. सदर बँक गॅरंटीसाठी लागणारा खर्च जल जीवन मिशन कार्यक्रमांतर्गत निधीमधून म्हणजेच, PFMS मधून अनुज्ञेय नाही. त्यामुळे यासाठी लागणारा निधी म.जी.प्रा.च्या स्वनिधीतून उपलब्ध करुन दिल्यास, रोड क्रॉसिंगची परवानगी प्राप्त करुन घेणे सुलभ होईल व जल जीवन मिशन कार्यक्रमांतर्गत कामे वेळेवर पूर्ण करता येतील. या कार्यक्रम बाबीवर मा.संचालक मंडळाच्या बैठकीत सविस्तर चर्चा झाली व पुढीलप्रमाणे ठराव पारीत करण्यात आला. व खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून पुढीलप्रमाणे ठराव पारीत करण्यात आला.

**ठराव :**

जल जीवन मिशन कार्यक्रमांतर्गत पाणी पुरवठा योजनांच्या बाबतीत राष्ट्रीय महामार्ग क्रॉसिंगच्या बाबतीत भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाकडे जमा करावयाच्या परफॉर्मन्स बँक गॅरंटीसाठी लागणारी रक्कम म.जी.प्रा.च्या स्वनिधीतून उपलब्ध करुन देण्यास मान्यता मिळणेबाबतच्या प्रस्तावास मा.संचालक मंडळाने पुढील अटी व शर्तीचे अधिन राहून मान्यता दिली.

**अटी व शर्ती :**

१) काम पूर्ण झाल्यानंतर, परफॉर्मन्स बँक गॅरंटी तात्काळ मुक्त करुन घेण्याची जबाबदारी संबंधीत कार्यकारी अभियंता यांची राहील.

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

२) त्याचप्रमाणे कामाच्या अंमलबजावणीच्या वेळी ठेकेदारांकडून झालेल्या काही नुकसानापोटी भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाकडून काही रक्कम वजाती करुन घेण्यात आल्यास अशा रक्कमेची वसूली संबंधीत ठेकेदाराकडून वसूल करुन म.जी.प्रा.कडे जमा करुन घेण्याची जबाबदारी संबंधीत कार्यकारी अभियंता यांची राहील.

३) सदर बँक गरंटीसाठी क्षेत्रिय कार्यालयाकडून निधी मागणी करण्यात आल्यास योजनानिहाय निधी तात्काळ उपलब्ध करुन देण्यासाठीची सर्वतोपरी कार्यवाही संचालक (वित्त) यांच्या कार्यालयाने करावी.

या बाबतीत पुढील कार्यवाही करण्यास मा.सदस्य सचिव तसेच संचालक (वित्त) यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे अध्यक्ष यांच्या मान्यतेने पुढीलप्रमाणे आयत्यावेळीचे विषय घेण्यात आले.

**आयत्या वेळेची कार्यक्रम बाब क्र.१ :-**

**विषय :-** महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मालकीच्या नागरी, ग्रामीण पाणी पुरवठा योजना, डोंगराळ/पर्यटन क्षेत्रातील पाणी पुरवठा योजना व पेरी अर्बन योजना मधून होणा-या पाणी पुरवठयाच्या दराचा आढावा व सुधारीत दरांस मंजूरी.

सदर कार्यक्रम बाबी वर सदस्य सचिव यांनी प्रस्तावित पाण्याच्या दर वाढीबाबत संचालक मंडळास अवगत केले. सदर कार्यक्रमाच्या अनुषंगाने सर्वपक्ष चर्चा झाली. सदर चर्चेत मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा अध्यक्ष, मजीप्रा व संचालक मंडळ यांनी सदर प्रचलित पाणी पट्टी दरात १० टक्के वाढ करण्याचे निर्देशित केले.

**ठराव :-**

असा ठराव पारित करण्यात येतो की, वरील प्रस्तावामध्ये नमुद केलेल्या पाणी पुरवठा योजनांसाठी पाणी पुरवठयाचा दर पुढे प्रस्तावित केल्याप्रमाणे दि.०१.०४.२०२३ पासून अथवा ज्या दिनांका पासून अधिसूचित करण्यात येईल त्या दिनांका पासून आकारण्यात यावेत.

| | | |
|---|---|---|
| परिशिष्ट-१ | विवरणपत्र-१ | नागरी पाणी पुरवठा योजना व पाणी पुरवठा केंद्रे |
| | विवरणपत्र-२ | ग्रामीण पाणी पुरवठा योजना व पाणी पुरवठा केंद्रे |
| परिशिष्ट-२ | विवरणपत्र-३, ४ | ग्रामीण पाणी पुरवठा योजना व पाणी पुरवठा केंद्रे |

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

| | | |
|---|---|---|
| परिशिष्ट-३ | विवरणपत्र-५, ६ | पर्यटन व डोंगराळक्षेत्रातील पाणी पुरवठा योजना व पाणी पुरवठा केंद्रे |
| परिशिष्ट-४ | विवरणपत्र-७, ८ | पेरी अर्बन पाणी पुरवठा योजना व पाणी पुरवठा केंद्रे |
| परिशिष्ट-४ | विवरणपत्र-९ | हस्तांतरीत योजना (देहू)(निरंक) |
| परिशिष्ट-५ | विवरणपत्र-१० | पाण्याचा उत्पादक दर जास्त असलेल्या नागरी पा.पु.यो. |
| परिशिष्ट-६ | विवरणपत्र-११, १२ | पाण्याचा उत्पादक दर जास्त असलेल्या ग्रामीण पा.पु.यो. |
| | विवरणपत्र-१३ | अंबरनाथ बदलापूर पाणी पुरवठा केंद्र |
| | विवरणपत्र-१४ | प्रकल्प क्षेत्राबाहेरील पाणी पुरवठा केंद्र |
| | विवरणपत्र-१५ | ग्रामीण पाणी पुरवठा योजना |

याबाबत पुढील कार्यवाही करण्यास महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

**आयत्या वेळेची कार्यक्रम बाब क्र.२ :-**

**विषय :-** महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या अधिकारी/कर्मचा-यांना शासकीय सेवेत समावेश करणेबाबत.

उपरोक्त कार्यक्रम बाब मा.संचालक मंडळासमोर सादर करण्यात येऊन त्यावर सविस्तर चर्चा होऊन खालीलप्रमाण ठराव पारित करण्यात आला आहे.

**ठराव :-**

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील अधिकारी/कर्मचा-यांचा शासकीय सेवेत समावेशन करण्याच्या अनुषंगाने सर्वंकष बाबींचा विचार करुन धोरणात्मक निर्णय घेण्यात येत आहे व याअनुषंगाने महाराष्ट्र जीवन प्राधिकरण अधिनियम १९७६ मध्ये आवश्यक तो बदल करण्यासंदर्भातील सविस्तर प्रस्ताव शासनास सादर करण्याची शिफारस करण्यात येत आहे व सदरील समावेशनाच्या अनुषंगाने पुढील सर्व आवश्यक ती कार्यवाही करण्यासाठी सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.